वर्ष : ०४ | अंक: २० | मुंबई, मंगळवार १० एप्रिल २०१८ ते १६ एप्रिल २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG|2 मुख्यमंत्र्यांचा हात पवारांच्या जबड्यात!

3 → इंधनाचा भडका

पराभवाच्या भीतीमुळेच भाजपला युतीची आठवण ← 4




# वाघाला रोखणे किंवा गोंजारणे शक्य नाही





**मुंबई: शिवसेना आमच्या सोबत रहावी अशी आमची इच्छा आहे, असं सांगत मैत्रीचा हात पुढे करणाऱ्या भाजपला शिवसेनेने फटकारले आहे. 'शिवसेनेचा वाघ हा पिंजऱ्यातील वाघ नसल्याने तो राज्याच्या व राष्ट्राच्या प्रश्नांवर गर्जना करीत आहे. वाघाला रोखणे किंवा गोंजारणे आता शक्य नाही,' असं स्पष्ट करत भाजपबरोबर युती न करण्याचे संकेत शिवसेनेने दिले आहेत.**

भाजपच्या स्थापना मेळाव्यात मुंबईत येऊन भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांनी शिवसेनेसोबत युती करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्याआधी राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही लोकसभा निवडणुकीत भाजप-शिवसेनेची युती होणार असल्याचे स्पष्ट केलं होते. यापार्श्वभूमीवर शिवसेनेने भाजपबरोबर युती होणार नसल्याचं पुन्हा एकदा स्पष्ट केलं आहे. आजच्या दैनिक 'सामना'च्या अग्रलेखातून उद्धव ठाकरे यांनी ही भूमिका मांडली आहे.

### *भाजपचे बिनपंखाचे विमान उडतेच आहे...*

२०१९ चे चित्र पूर्ण वेगळे असेल, पण भाजप अजूनही २०१४ च्या सुवर्णकाळात रमून बसला आहे. भाजपला मित्रांची गरज नाही. ते मजबूत व स्वयंभू आहेत. शिवसेनेने सोबत असावे असे त्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी उडत उडत सांगितले आहे. हा सद्विचार त्यांना २०१४ साली सुचला नाही व सत्ता मिळाल्यावरही ते विनय हरवून बसले. त्यांचे बिनपंखांचे विमान ढगात उडाले ते उडतेच आहे. आता उतरवायचे म्हटले तर त्यासाठी जमीन नाही, असा टोला हाणतानाच सुवर्णकाळातील सुवर्ण कौले फुलपूर-गोरखपूरमधून उडून गेल्यावर काही गोष्टी सुचू लागल्या. भाजपने सुवर्णकाळाचे स्वप्न पाहावे. आमच्या त्यांना शुभेच्छा आहेत!, असा चिमटा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपला काढला आहे.

## उद्धव काय म्हणाले?


- भारतीय जनता पक्षाच्या सुवर्णकाळासाठी कामाला लागा असे आवाहन त्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांनी केले आहे. भाजपचा स्थापना दिवस सोहळा मुंबईत साजरा झाला. त्या निमित्ताने अध्यक्ष महोदयांनी विचारांचे भस्म उधळले आहे. स्थापना मेळावा प्रचंड झाला. सत्ताधाऱ्यांना साजेशा श्रीमंती थाटात झाला. राज्यात व केंद्रात सरकारे असल्याने हे होणारच.
- अमित शहांचे भाषण दमदार झाले व त्यांनी भाजप विरोधकांना चांगलेच फैलावर घेतले. भाजपचे विरोधक हे साप, मुंगूस, कुत्री, मांजरी आहेत. एकमेकांशी वैर असलेले हे प्राणी मोदी महापुरात निभाव लागणार नाही म्हणून एकत्र आल्याचा विचार अमित शहा यांनी मांडला. 'यूपीए' सरकारच्या काळातही यातले काही साप, कुत्री, मांजरी काँग्रेसबरोबर होते व मोदी लाट दिसताच यापैकी काही प्राणी भाजपच्या तंबूत शिरले.
- राष्ट्रीय अध्यक्षांनी भाषणात सांगितले की, त्यांचे सरकार सिंहाचे आहे. सिंहालादेखील भूक लागते व सिंहाचा वाटा इतरांपेक्षा मोठा असतो हे मुंबईत आलेल्या सिंहांनी दाखवून दिले. भाजपचा सुवर्णकाळ सध्या सुरू असल्याने 'उपाशी' राहायचे नाही व नोटाबंदी वगैरेंची फिकीर करायची नाही हे तर ओघाने आलेच.

## बेस्ट प्रवास महागणार, दरवाढीच्या प्रस्तावाला हिरवा कंदील

**मुंबई-** गुरूवार मध्यरात्रीपासून तुमचा बेस्ट प्रवास महागणार आहे. बेस्ट दरवाढीच्या प्रस्तावाला बृहन्मुंबई वाहतूक विभाग हिरवा कंदील देणार आहे. भाडेवाढीबाबतचा कोणताही प्रस्ताव बेस्टकडे आला नसल्याचं बेस्टने सांगितलंय. मात्र आल्यावर गुरूवारपर्यंत बेस्ट भाडेवाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ११ एप्रिलच्या मध्यरात्रीपासून हा प्रवास महागण्याची शक्यता आहे. चार किलोमीटरच्या पुढच्या टप्प्यांना ही भाडेवाढ लागू असेल. १ रूपया ते १२ रूपये या दरम्यान विविध टप्प्यांनुसार ही भाडेवाढ असेल.

## 'प्लॅस्टिक' विरोधातील कारवाई २३ जूननंतरच!

### सोशल मीडियावरील व्हायरल पोस्ट खोटी



मुंबई - अंधेरी चकाला येथील एका मेडिकल दुकानावर पालिकेने कारवाई केल्याचा मेसेज सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. दुकानाला पाच हजारांचा दंड केल्याची पावतीही व्हायरल झाली होती. मात्र ही कारवाई प्लास्टीक बंदीच्या विरोधातील नसल्याचे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्लास्टिकबंदी अंतर्गत २३ जूनपर्यंत कोणतीही कारवाई केली जाणार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

गुढीपाडव्यापासून राज्य सरकारने राज्यात प्लास्टिकच्या वापरावर बंदी घातली आहे. त्यातच व्हायरल झालेल्या या मेसेजमुळे मुंबईकरांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. तुमच्या हातात प्लास्टिकची बॅग दिसली तरी तुम्हाला दंड होऊ शकतो, असेही या मेसेजमध्ये म्हटले होते. त्यामुळे काही काळ संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र २३ जूनपर्यंत कारवाई केली जाणार नसल्याचे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### ही कारवाई जुन्या नियमानुसार

चकाला येथे करण्यात आलेली कारवाई ही जुन्या नियमानुसार केली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. २६ जुलैच्या अतिवृष्टीनंतर मुंबईमध्ये ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या वापरण्यास बंदी आहे. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली होती. ५० मायक्रॉनपेक्षा वरील पिशव्यांवर सध्या तरी कारवाई केलेली नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

## हवाईदलाचे ४ जवान यमुना नदीत बुडाले



**अलाहाबाद** - उत्तर प्रदेशमधील अलाहाबादमध्ये आज त्रिवेणी संगममध्ये अंघोळीसाठी उतरलेले हवाईदलाचे ४ जवान यमुना नदीत बुडाले. दोन जवानांना वाचवण्यात यश आले असून दोन जवानाचा मात्र बुडून मृत्यू झाला आहे.

अरैलीमधील हवाईदलाचे ४ जवान सकाळी अंघोळीसाठी यमुना नदीत उतरले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने ४ जवान पाण्यात बुडाले. यावेळी दोघांना वाचवण्यात यश आले. परंतु, दोघांचा बुडून मृत्यू झाला. यापैकी एकाचा मृतदेह मिळाला असून दुसऱ्याचा मृतदेह अद्याप मिळालेला नाही. मृतदेह शोधण्यासाठी पोलीस आणि खलाशांमार्फत शोधमोहीम सुरू आहे.

हवाईदलाच्या चार जवानांपैकी एकाची ओळख पटली आहे. सत्यम आर्य या जवानाचा मृतदेह अरैल घाटात मिळाला आहे. तर मयंग अग्निहीस या जवानाच्या मृतदेहाचा शोध घेण्यात येत आहे.

## खूशखबर...! खूशखबर...!

# म्हाडा लॉटरीत यंदा मिळणार १००१ घरे



**मुंबई - मुंबईकरांना प्रतीक्षा असलेल्या म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या घरांच्या लॉटरीची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही. मात्र, घरांची अंतिम संख्या म्हाडाने जाहीर केली असून यंदाच्या लॉटरीत एक हजार एक घरांचा समावेश करण्यात येणार आहे. यंदाच्या लॉटरीतील निम्मी, म्हणजे पाचशे घरे अल्प उत्पन्न गटासाठी राखून ठेवली आहेत, हे यंदाच्या लॉटरीचे वैशिष्ट्य आहे. मुख्य म्हणजे लॉटरी सोहळ्याच्या खर्चात कपात करण्यासाठी वांद्रे येथील म्हाडाच्या मुख्यालयात मंडप उभारून लॉटरी जाहीर करण्याची योजना आहे. त्याशिवाय फेसबुक लाइव्हवर लॉटरीचे थेट प्रक्षेपण होणार आहे.**




म्हाडा घरांची लॉटरी सर्वसाधारणपणे दरवर्षी मे महिन्यात काढली जाते. पण यंदा मे महिन्यात लॉटरी काढली जाण्याची शक्यता कमी आहे. मागील वर्षी १० नोव्हेंबरला लॉटरी काढली होती. त्यावेळी फक्त ८१९ घरांचा लॉटरीत समावेश होता. लॉटरीत सर्वाधिक मागणी अत्यल्प व अल्प उत्पन्न गटातील घरांसाठी असते. मागील वर्षी अत्यल्प उत्पन्न गटासाठी एकाही घराचा लॉटरीत समावेश ससल्याने म्हाडावर खूप टीका झाली होती. यंदा अत्यल्प उत्पन्न गटासाठी २८३ तर अल्प उत्पन्न गटासाठी तब्बल ५०० घरे राखून ठेवली आहे. त्यामुळे गरीब व सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

म्हाडा लॉटरी दरवर्षी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात काढली जाते. यासाठी मंडप, पंखे, टीव्ही स्क्रीन, सुरक्षा व्यवस्था, जेवण यावर मोठी रक्कम खर्च होते. यावर्षीची लॉटरी वांद्रे येथील म्हाडाच्या मुख्यालयात काढण्यात येणार असल्याने खर्चात मोठी कपात होणार आहे. मागील वर्षीप्रमाणे यंदाही फेसबुकवर म्हाडाची लॉटरी लाइव्ह करण्यात असल्याने गर्दी काही होईल, अशी अपेक्षा आहे.

**▶ *अल्प उत्पन्न गटासाठी घरे***

पीएमजीपी मानखुर्द - ११४
मुलुंड गव्हाणपाडा- २६९
सायन प्रतीक्षानगर- ८४
गोरेगाव सिद्धार्थनगर- २४
घाटकोपर पंतनगर-२
विक्रोळी टागोरनगर- ७
एकूण घरे -५००

**▶ *अत्यल्प उत्पन्न गटासाठी घरे***

वडाळा अँटॉप हिल- २७८
म्हाडा इमारत घरदुरुस्ती मंडळ- ५
एकूण- २८३


**▶ *मध्यम उत्पन्न गट***

विक्रोळी कन्नमवार नगर- २८
कांदिवली महावीर नगर- १७२
मानखुर्द- पीएमजीपी १६
एकूण २१६

**▶ *उच्च उत्पन्न गट***

घाटकोपर पंतनगर - २

## सौजन्य व्हॉट्सअप




# मुंबई फास्ट न्यूज चॅनेलच्या द्वितीय वर्धापन संपन्न

## वेगवेगळ्या क्षेत्रात कामगिरी बजावलेल्या व्यक्तिंना पद्मश्री पुरस्कारीत सरकारी वकील उज्वल निकम यांच्या हस्ते गौरव पुरस्कार सोहळा प्रदान करण्यात आले

## पोलिस बातमीपत्रचे संपादक दिपक नाईक यांनाही या प्रसंगी पुरस्कार देण्यात आला

मुंबई फास्ट न्युज चॅनेलच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त वेगवेगळया क्षेत्रात कामगिरी बजावलेल्या व्यक्तींना मद्मश्री पूरस्करीत सरकारी वकील उज्वल निकम यांच्या हस्ते गौरव पूरस्कार सोहळा संपन्न

मुंबई फास्ट न्युज चॅनेलचा द्वितीय वर्धापन दिन सोहळा रविवार दिनांक ८ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळी काजल मैदान श्वेता रेसीडेन्सी जवळ रामदेव पार्क मैदानाच्या बाजूला मिरा रोड येथे आयोजित केला होता. यामध्ये प्रमुख पाहूणे म्हणून विशेष सरकारी वकील उज्वल निकम उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये पत्रकारांनी आपल्या लेखणीतून सत्य बाहेर येईल असेच लिहावे व चॅनल वाल्यांनी जसे आहे तसेच दाखववावे . यामध्ये फेरबदल करुन कोणाही व्यक्तीचे आयुष्य बरबाद होईल असे कृत्य करु नये. प्रत्यक्ष शहानिशा करावी व ते लोकांसमोर ठेवावे अशा पद्धतीचे विचार मांडले. मुंबई फास्ट न्यूज चॅनलचे मुख्य संपादक श्री. विजय मोरे यांना ही त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या व मिरा भाईंदर मधील आपल्या विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्यांना गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. यामध्ये अभ्यासू नगरसेवक म्हणून रोहीत सुवर्णा, रोज गोरगरिबांना मोफत जेवणाचे डबे पूरवणारे श्रावणबाळ योजनेचे श्री डॉ.उदय मोदी , ठाणे महानगर पालिकेत सलग दोन वेळा

उर्वरित पृष्ठ 4 वर



# मुख्यमंत्र्यांचा हात पवारांच्या जबड्यात!

## भाजपा - राष्ट्रवादीतील संघर्ष तीव्र होणार

**मुंबई- 'चहावाल्याच्या नादी लागाल, तर औषधालाही शिल्लक राहणार नाही,' अशा शब्दांत आव्हान देत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारच्या भाजपा महामेळाव्यात थेट राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या जबड्यात हात घातला. 'सत्तेत शिवसेनेबरोबर, पण जवळीक राष्ट्रवादीशी,' या स्थितीतून बाहेर पडत, थेट पवारांना अंगावर घेण्याची भूमिका मुख्यमंत्र्यांनी जाहीरपणे घेतल्याने, भाजपा-राष्ट्रवादीतील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.**



महामेळाव्याला प्रचंड गर्दी जमविण्यात भाजपाला मोठे यश मिळाले. मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष खा. रावसाहेब दानवे व मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांच्या चेहऱ्यावर या गर्दीचे समाधान महामेळाव्याच्या वेळी स्पष्टपणे दिसत होते. कार्यकर्त्यांमध्ये जोश भरला, तो मुख्यमंत्र्यांच्या भाषणाने. महाराष्ट्राच्या राजकारणात पवारांना आव्हान देणारे अनेक नेते संपले वा त्यांनी पवारांशी जुळवून घेतले. आपल्या वयाइतका संसदीय कारकिर्दीचा अनुभव असलेल्या पवारांसमोर मुख्यमंत्र्यांनी जाहीररीत्या दंड थोपटले.

राजकीय खेळींमध्ये निपूर्ण पवारांवर थेट हल्लाबोल करण्याचा अर्थ मुख्यमंत्र्यांना कळतच असणार, तरीही त्यांनी जोखीम पत्करली. एका विशिष्ट काळात गोपीनाथ मुंडे यांनी ती पत्करली आणि युतीची सत्ता पहिल्यांदाच महाराष्ट्रात येण्यास त्यामुळे मोठी मदत झाली होती. मुंडेंचा अपवाद सोडला, तर अगदी पंतप्रधान नरेंद्र मोदी हेही पवारांचे बोट धरून राजकारणात आल्याचे जाहीरपणे सांगणारे. मात्र, एकीकडे पवार आणि संपूर्ण राष्ट्रवादीने भाजपावरील हल्ले तीव्र केलेले असताना, 'बोट(धरू) चेपेपणाची भूमिका घेऊन चालणार नाही, हे ओळखून मुख्यमंत्र्यांनी बारामतीकरांवर शरसंधान साधले, असे दिसते. मोदींविरोधातील सर्व शक्तींना एकत्रित आणण्यासाठी पवारांनी राष्ट्रीय स्तरावर घेतलेला पुढाकार लक्षात घेऊन, त्यांच्यावर निशाणा साधण्याबाबत मुख्यमंत्र्यांना भाजपाश्रेष्ठींनीही 'ग्रीन सिग्नल' दिलेला दिसतो.

सरकारमध्ये शिवसेना सोबत असताना आपले नेते राष्ट्रवादीला गोंजारत असल्याने, भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये असलेली अस्वस्थता उशिरा का होईना, फडणवीस यांनी ओळखली हे बरे झाले. आघाडी सरकारमधील घोटाळ्यांचा विषय केवळ छगन भुजबळांपुरताच मर्यादित राहणार नाही, अशी आता तरी अपेक्षा आहे.

# मुंबई-ठाणेकरांना टोल दिलासा

**मुंबई-** मुंब्रा बायपास रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुलाच्या दुरुस्तीसाठी या मार्गावरील वाहतूक आनंदनगर चेकनाका- ऐरोलीमार्गे वळविण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबई-ठाणेकरांना टोलभारमधून दिलासा देण्याच्या हालचाली सरकारने सुरू केल्या असून मुलुंड किंवा ऐरोली यापैकी कोणत्याही एका नाक्यावर टोल भरल्यास दुसऱ्या नाक्यावर टोल भरावा लागणार नाही. त्याबाबतचा शासन निर्णय लवकरच काढण्यात येणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.

मुंब्रा बायपास मार्गावर अवजड वाहनांची सतत गर्दी असल्यामुळे मध्य रेल्वेवरील उड्डाणुलास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पुलाची दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यात असून दुरुस्तीचे काम येत्या १६ एप्रिलपासून सुरू होणार आहे. त्यामुळे बायपास मार्ग पुढील दोन-तीन महिने बंद राहणार असून या दरम्यानच्या काळात ही वाहतूक ठाण्यातील आनंदनगर-ऐरोलीमार्गे वळविण्यात येणार आहे. परिणामी मुंबई-ठाणेकरांना आनंदनगर टोलनाक्यावरील मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा




लागणार आहे. ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच, ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, मुंबई, नवी मुंबई आदी महापालिकांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व रस्त्यांची डागडुजी करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाममंत्री (सार्वजनिक उपक्रम) एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

या मार्गावर लोकांना मुलुंड आणि एरोली या दोन्ही नाक्यांवरील टोलमधून दिलासा मिळणार आहे. याबाबत एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता, ऐरोली आणि मुलुंड या दोन टोलनाक्यांमधील अंतर कमी असून लोकांना नाहक भुर्दंड पडू यासाठी एका टोलनाक्यावरच टोल भरल्यास दुसऱ्या टोलनाक्यावर सवलत देण्याच्या प्रस्तावावर सरकार लवकर निर्णय घेईल, असे त्यांनी सांगितले.

# मुंबई विद्यापीठाच्या ३० परीक्षा पुढे ढकलल्या

**मुंबई-** मुंबई विद्यापीठाच्या भोंगळ कारभारावरुन ते कायमच चर्चेत असते. आता पुन्हा एकदा एका नवीन विषयावरुन विद्यापीठाबाबत चर्चा सुरु झाली आहे. त्याचे कारणही तसेच आहे, विद्यापीठाने तब्बल ३० परीक्षांच्या तारखा पुढे ढकलल्या आहेत. नुकतीच याबाबतची घोषणा करण्यात आली असून यात कॉमर्स, मॅनेजमेंटसह आर्टस शाखेतील विषयांबरोबरच सायन्स आणि कायद्याच्या परीक्षांचा समावेश आहे. विद्यापीठाने आपले सुधारित वेळापत्रक वेबसाईटवर जाहीर केले आहे. याआधी झालेल्या परीक्षांचे निकाल अद्याप लागलेले नसताना पुढील परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. इतकेच विद्यापीठाने हा निर्णय घेतला असण्याची शक्यता आहे. यातील काही परीक्षाच्या बदललेल्या तारखा जाहीर करण्यात आल्या असून बाकी परीक्षांच्या नवीन तारखा अद्याप सांगण्यात आलेल्या नाहीत. एमएससी फॉरेन्सिक सायन्स सेमिस्टर-१ची १६ एप्रिलपासून सुरू होणारी परीक्षाही लांबणीवर पडली असून,



ती आता ४ जूनपासून सुरू होईल. बीकॉम (फायनान्शिअल मॅनेजमेंट, सेमिस्टर-५), बीकॉम (अकाऊंट्स अँड फायनान्स) या परीक्षाही पुढे ढकलण्यात आल्या आहेत. तर आर्ट्स शाखेच्या टीवायबीए, एमएच्या परीक्षांसाठीही नवे वेळापत्रक जाहीर केले आहे. तीन दिवसांवर आलेल्या बी. कॉम. ची परीक्षा मे महिन्यात होईल. तर १० एप्रिल रोजी होणारा बीकॉम (फायनान्शियल मॅनेजमेंट सेमिस्टर ५, फायनान्शियल मार्केट्स सेमिस्टर ५, अकाऊंटिंग अँड फायनान्स) चा पेपर आता २ मे रोजी घेतला जाईल, तसेच १६ एप्रिलपासून सुरू होणारी एमएससीची परीक्षा २ जूनपासून सुरू होणार आहे. १८ एप्रिल रोजी होणारी एमएची परीक्षा २१ मे रोजी होईल. १० एप्रिल रोजी होणारी एमएडची परीक्षा १५ मे रोजी होणार आहे.

# नीरव मोदी आणि मेहुल चोक्सीविरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट जारी

**मुंबई- पंजाब नॅशनल बँकेत १३,००० कोटी रुपयांचा घोटाळा करणारा हिरे व्यापारी नीरव मोदी आणि गीतांजली जेम्सचा अध्यक्ष मेहुल चोक्सी यांच्याविरोधात मुंबईतील सीबीआयच्या विशेष न्यायालयाने अजामीनपात्र अटक वॉरंट काढले आहे. यापूर्वी नीरव मोदी आणि मेहुल चोक्सी यांचा भारतीय पासपोर्टही रद्द करण्यात आला आहे.**

या प्रकरणातील नव्या माहितीनुसार, भारताने हाँगकाँगच्या पोलीस अधिकाऱ्यांना पीएनबी घोटाळ्यामधील आरोपी नीरव मोदीला अटक करण्याचे आवाहन केले आहे. नीरव मोदी हाँगकाँगमध्ये लपला असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कारण त्याने अलाहाबाद बँकेच्या हाँगकाँग शाखेतून पैसे काढल्याची नोंद झाली आहे.

दरम्यान, पंजाब नॅशनल बँकेला चूना लावल्याप्रकरणी नीरव मोदीच्या विरोधात सीबीआयकडून पहिला गुन्हा दाखल झाल्यानंतर हप्त्याभरानंतर नीरवने बेल्जिअमच्या एंटवर्प शहरातील एका



भारतीय सरकारी बँकेच्या शाखेतून मोठी रक्कम काढल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे तो बेल्जिअममध्ये पळून गेल्याचे सांगण्यात येत होते.

केंद्रीय तपास पथकाच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, बँकेतून मोठी रक्कम काढण्याचा हा प्रकार मोठा आश्चर्यकारक आहे. कारण ३१ जानेवारी २०१८ ला भारतीय बँकांच्या सर्व विदेशातील शाखांना या बाबतीत सावधान करण्यात आले होते. सीबीआय सातत्याने परदेशातील भारतीय बँकांच्या अधिकाऱ्यांशी संपर्कात आहेत. नीरव मोदीच्या व्यवहारांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत.

# मुंबईत अनुसुचित जातींवरील अत्याचाराचे प्रमाण अत्यल्प

**मुंबई-** मुंबई शहर जिल्ह्यात अनुसूचित जातींसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत असून, अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत देण्यात आलेला निधी ९९ टक्क्यांपेक्षा जादा खर्च झाला आहे. मुंबईत अनुसुचित जातींवरील अत्याचाराचे प्रमाण अत्यल्प असून, ही बाब समाधानकारक आहे, असे कौतुक केंद्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या सदस्य डॉ. स्वराज्य विद्वान यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना केले.


अनुसूचित जातीसाठी मुंबई शहर जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा डॉ. विद्वान यांनी मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी वरील माहिती दिली.



राष्ट्रीय अनुसूचित जाती-जमाती आयोग आपल्याकडे येणाऱ्या अनुसूचित जातीच्या घटकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांना न्याय मिळवून देण्याचे काम करते. अनुसूचित जातीच्या घटकांसाठीच्या योजना कशा प्रकारे राबविल्या जातात याचे निरीक्षण करते. मुंबई शहराचा आढावा घेतला असता अनुसूचित जातीच्या घटकांवर अन्याय वा अत्याचाराचे प्रमाण अत्यल्प आहे. केवळ एक हत्या व दोन बलात्कारांच्या घटना समोर आल्या आहेत. याबाबत संबंधित अत्याचारग्रस्तांना आवश्यक ती मदत देण्यात आली आहे, असे डॉ. विद्वान यांनी सांगितले.

सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येत असलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजना प्रशंसनीय आहे. तसेच आंतरजातीय विवाहासाठी २४० दाम्पत्यांना प्रोत्साहनपर प्रतिदाम्पत्य ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. कंत्राटी पद्धतीवर कर्मचारी घेताना यामध्ये आरक्षणाचे सूत्र अवलंबले जावे, असेही मत आरक्षणासंदर्भातील प्रश्नाला उत्तर देताना डॉ. विद्वान यांनी व्यक्त केले.

# गिरणी कामगारांच्या मुलांना मिळणार नोकऱ्या



**मुंबई-** मुंबईचे वैभव असलेल्या गिरणी उद्योगाची स्मृती जपण्यासाठी काळाचौकी येथे बांधण्यात येणा-या पहिल्या वस्त्रोद्योग संग्रहालयासाठी अखेर सात वर्षांनंतर मुहूर्त सापडला आहे. केंद्र सरकारच्या युनायटेड टेक्सटाईल मिल क्रमांक २ व ३च्या भूखंडांवर हे वस्त्रोद्योग संग्रहालय उभारण्यात येणार आहे. या संग्रहालयाच्या पहिल्या टप्प्याच्या कामाला स्थायी समितीने शनिवारी मंजुरी दिली. या वस्तुसंग्रहालयात गिरणी कामगारांच्या मुलांना रोजगाराची संधी देण्याची सूचनाही मान्य करण्यात आली आहे.

१९८२मध्ये झालेल्या संपामुळे गिरण्या मुंबईतून नामशेष झाल्या. एकेकाळी मुंबईचे वैभव असलेल्या या वस्त्रोद्योगाची स्मृती पुसली जाऊ नये यासाठी काळाचौकी येथे मिलच्या जागेवर संग्रहालय उभारण्याचा निर्णय २०११मध्ये घेण्यात आला होता. मात्र मिलच्या जागेत बदल करण्यास पुरातन वस्तू समितीकडून आक्षेप घेण्यात आला. तसेच या प्रकल्पासाठी खर्च कोण करणार, असा सवालही होताच. याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर चर्चेसाठी आला असता राष्ट्रवादीच्या गटनेत्या राखी जाधव यांनी या वस्तुसंग्रहालयात ज्या नोकऱ्या निर्माण होतील त्यात गिरणी कामगारांच्या मुलांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी केली. ही उपसूचना मान्य करीत एकमताने हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

# 'रायगडाला आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक बनविणार'

**मुंबई-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनंतर किल्ले रायगडाच्या पुर्ननिर्मितीसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आग्रही आहेत. त्यांच्या प्रयत्नातून स्वराज्याची राजधानी असणाऱ्या किल्ले रायगडाचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारणार असल्याचा संकल्प केंद्र शासनाच्या पुरातत्त्व खात्याने सोडला आहे. रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून खात्याचे मुंबई प्रभारी नंबी राजन यांनी महाड येथे झालेल्या पत्रकारांच्या चर्चेदरम्यान ही माहिती दिली. केंद्रीय पुरातत्त्व खात्याच्या यंत्रणेखाली रायगड प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या किल्ले रायगडावरील उत्खनना संदर्भात शुक्रवारी रात्री हॉटेल विसावा येथे या खात्याचे क्षेत्रीय निर्देशक नंबी राजन व पुरातत्त्व खात्याचे अधीक्षक नेगी यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी रायगड प्रभारी कांबळे हेही उपस्थित होते.

पुरातत्त्व खात्याच्या इतिहासात शासनामार्फत आजपर्यंत पहिल्यांदाच सुमारे सहाशे कोटी रुपये एवढी भरीव तरतूद करण्यात आली आहे. तसेच ती प्राधिकरणाच्या माध्यमातून किल्ले रायगडच्या निर्मितीसाठी खर्च होणार आहे. अनुभवी तज्ज्ञ मंडळीच्या मार्गदर्शनाखाली अधिक साहित्यांचा वापर करून किल्ले रायगडाचे पुनर्वैभव निर्माण करण्याचा शासनाचा संकल्प असल्याचे नंबी राजन यांनी यावेळी स्पष्ट केले. पुरातत्त्व खात्याच्या कायद्यानुसार किल्ले रायगडावर आजपर्यंत सुरू असलेली कामे यापुढे रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून शासनाच्या विविध खात्यांनी एकत्रितपणे करण्याचा निर्णय झाला आहे. यासंदर्भात प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर कामांना वेग आल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. या कामांमध्ये सार्वजनिक बांधकाम, वीज मंडळ, पाणीपुरवठा, पर्यटन मंडळ आदी विभागांचा समावेश असल्याची माहिती नंबी राजन यांनी दिली.



## जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्र व पंचनामा गुन्हेगारीचा वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार उब्दोधन वर्ण

**मुंबई–** शनिवार दिनांक०७ एप्रिल २०१८ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय चिरा बाजार येथे जर्नालिस्ट युनिअन ऑफ महाराष्ट्र व पंचनामा गुन्हेगारीचा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पत्रकार मार्गदर्शन वर्ग घेण्यात आला.

निवेदित पत्रकारांना पत्रकाराचे ज्ञान असणे गरजेचे आहे , बातमी कशी बनवायची व भाषाशैली चा कसा वापर करावा या विषयावर अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये प्रमुख वक्ते डॉ. मनोज वराडे बेस्ट जनसंपर्कअधिकारी हेमंत सामंत , राजकिय विष्लेशक विभाग प्रमुख पांडूरंग सकपाळ , महाराष्ट्र शासन सचिव शांताराम कूदळे , जर्नालिस्ट युनिअन चे अध्यक्ष नारायण पांचाळ , उपाध्यक्ष दिपक मोरेश्वर नाईक, सचिव सतिश साटम , मुंबई अध्यक्ष भिमराव धुळप आदी मान्यवर उपस्थित होते.

# दहिसरच्या तरुणावर प्राणघातक हल्ला

## रस्त्यावर रंगला थरार

**मुंबई–** फिरायला नेण्याच्या बहाण्याने मित्रांकडून महाविद्यालयीन तरुणावर प्राणघातक हल्ला चढविण्यात आला. रक्तबंबाळ अवस्थेत तो रस्त्यावरून पळत होता. त्याचे मित्र हातात लाकडी बांबू आणि वायर घेऊन त्याच्यामागे धावत होते. याच दरम्यान त्याने एका सोसायटीतील घरामध्ये स्वत:ला कोंडले. त्या घरातील एकाच्या मोबाइल क्रमांकावरून कुटुंबीयांना कळविले आणि स्वत:चा जीव वाचविला. या प्रकरणी दहिसर पोलिसांनी चौकडीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.



दहिसर पूर्वेकडील परिसरात फरदीन खान (१७) कुटुंबीयांसोबत राहतो. तो बारावीचा विद्यार्थी असून, ठाकूर रामनारायण महाविद्यालयात शिक्षण घेतो. बुधवारी तो नेहमीप्रमाणे कॉलेजला आला. दुपारी अडीचच्या सुमारास लंच ब्रेकला तो कॉलेजच्या बाहेरील उपाहारगृहात बसला होता. त्याच दरम्यान, जुना मित्र रायन फर्नांडिस (१९) त्याला भेटला. त्याने स्कुटीवरून फिरून येऊ यात असे सांगितले. दोघेही दहिसर टोलनाक्यावरून पेणकरपाडा, मिरा रोड येथील हरेकृष्ण चौकातील चहाच्या टपरीजवळ आले. दुपारी ३च्या सुमारास तेथे आणखीन मित्र येणार असल्याचे सांगितले. रायनसोबत गप्पा मारत असतानाच, त्याचे दोन मित्र तेथे धडकले.

त्यामधील एका मुलाने, त्याला विचारले की, 'तू ठाकूर कॉलेज में पढता है क्या?' त्याने होकार देताच दोघांनी त्याला मारहाण सुरू केली. त्यानंतर, आणखीन तीन मित्र तेथे आले. त्यांनीही जवळील लाकडी बांबूने, वारयरने मारहाण सुरू केली. त्याच्या गळ्यातील चेन आणि मोबाइलही काढून घेतला. तो रक्तबंबाळ अवस्थेत रस्त्यावरून धावत होता आणि तरुणही त्याला मारण्यासाठी पाठलाग करत होते. एका घराचा दरवाजा उघडा दिसला. त्या घरात तो घुसला आणि कडी लावून घेतली. तेथील महिलेला त्याने झालेला प्रकार सांगितला. त्यांच्या मोबाइल क्रमांकावरून त्यांनी नातेवाइकांना बोलावून घेतले.

# 'घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये सज्ञान मुलगीही देखभाल खर्च मागण्यास पात्र'

**मुंबई- घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये मुलगी सज्ञान झाली तरी तिच्या देखभालीचा खर्च वडिलांना द्यावाच लागेल वा ती वडिलांकडून खर्च मिळावा यासाठी दावा करू शकते, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला आहे. मुलीच्या वतीने तिची आईसुद्धा या देखभाल खर्चासाठी अर्ज करू शकते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.**

घटस्फोटीत पतीला १९ वर्षांच्या मुलीचा देखभाल खर्च देण्याचे आदेश द्यावेत या मागणीसाठी केलेला अर्ज कुटुंब न्यायालयाने फेटाळून लावल्याने त्याविरोधात मुंबईस्थित महिलेने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायमूर्ती भारती डांगरे यांनी मात्र या महिलेचा दावा योग्य ठरवत तिची मागणी मान्य केली.

याचिकाकर्त्या महिलेचा १९८८ साली विवाह झाला होता आणि तिला दोन मुले व एक मुलगी आहे. लग्नाच्या नऊ वर्षांनंतर तिने पतीपासून काडीमोड घेतला. पतीपासून विभक्त झाल्यानंतर तिन्ही मुलांचा ताबा तिला मिळाला



आणि तिन्ही मुले सज्ञान होईपर्यंत प्रत्येक महिन्याला वडील त्यांच्या देखभालीचा खर्च तिला देत असत. मुले सज्ञान झाल्यानंतर मात्र वडिलांनी देखभाल खर्च देणे बंद केले. परंतु मुलगी सज्ञान झाली असली तरी ती उच्च शिक्षण घेत असल्याने अद्यापही आर्थिकदृष्ट्या आपल्यावर अवलंबून आहे. तिच्या शिक्षणाचा खर्च खूप आहे. त्यामुळेच तिच्या वडिलांकडून तिच्या देखभालीचा खर्च प्रत्येक महिन्याला मिळावा, असा दावा या महिलेने केला होता. दुसरे म्हणजे एक मुलगा शिक्षणासाठी घेतलेले कर्ज फेडत आहे, तर दुसऱ्याला अद्यापही नोकरी लागलेली नाही. त्यामुळे दोन्ही मुलांकडून आपल्याला आर्थिक साहाय्य मिळत नाही, असा दावा तिने केला होता. या महिलेला घटस्फोटीत पतीकडून देखभाल खर्च म्हणून महिन्याला २५ हजार रूपये मिळतात. म्हणून मुलीलाही प्रत्येक महिन्याला १५ हजार रूपये खर्च देण्याचे आदेश पतीला द्यावेत, अशी मागणी तिने केली होती. परंतु कायद्यानुसार केवळ अल्पवयीन मुलीलाच देखभाल खर्च देण्याची तरतूद आहे. तसेच सज्ञान मुलगी आपल्या आईमार्फत देखभाल खर्चासाठी दावा करू शकत नाही, असे स्पष्ट करत कुटुंब न्यायालयाने तिचा अर्ज फेटाळून लावला. तर घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये सज्ञान वा अविवाहित मुलगीसुद्धा देखभाल खर्च मागू शकते, असा निकाल सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाने अनेकदा दिलेला आहे. त्यामुळेच या प्रकरणातही सज्ञान मुलगी वडिलांकडून देखभाल खर्च मिळवण्यास पात्र आहे, असे स्पष्ट करत कुटुंब न्यायालयाचा आदेश न्यायालयाने रद्द केला. तसेच याचिकाकर्त्यांचा अर्ज नव्याने ऐकून त्यावर निर्णय देण्याचे आदेशही कुटुंब न्यायालयाला दिले.

## संपादकीय... शेतकरी-संपन्नतेसाठी आवश्यक पावले



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

आजकालच्या वृत्तपत्रांमध्ये शेतकरी आत्महत्या, शेतकऱ्यांचे प्रश्न, आंदोलने यांच्या बातम्या प्रचंड प्रमाणात असतात. या बातम्यांवरून देशाच्या कृषी क्षेत्रातील व्यापक त्रुटी, उणिवा स्पष्ट होतात. यूपीए सरकारच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात शेतीतील जीडीपी (सकल देशांतर्गत उत्पादन) वाढ वर्षाला ३.७ टक्के एवढी होती. मोदी सरकारच्या पहिल्या चार वर्षांमध्ये हा वेग मंदावला. जीडीपीची वाढ २.४ टक्क्यांवर आली. २०१४ आणि २०१५ मध्ये दुष्काळ होता. त्यामुळेही कदाचित ही मंदी आली असावी. असे असले तरी देशाचे आर्थिक धोरणही यासाठी जबाबदार धरावे लागेल. या चार वर्षांमध्ये किमान हमी भाव (एमएसपी) खूपच कमी प्रमाणात वाढला. नोव्हेंबर २०१६ मध्ये झालेल्या नोटबंदीनेही कृषी बाजारात प्रचंड गोंधळ माजला. यामुळे शेतकऱ्यांच्या कष्टाच्या पिकांना पूर्ण किंमत मिळू शकली नाही. आपल्या पिकांना, अन्नधान्याला रास्त भाव मिळत नाही, ही शेतकऱ्यांनी सामान्य तक्रार आहे. मात्र हा प्रश्न केवळ किमतींचा नाही किंवा कर्जमाफीचाही नाही. वास्तव हे आहे की, आपल्या देशातील जमिनीची उत्पादकताच कमी आहे. छोट्या-छोट्या जमिनीच्या तुकड्यांवर शेती करणारेच आपल्याकडे लाखोंच्या संख्येने आहेत. आपल्या शेतीची दर हेक्टरी उत्पादकता चीन किंवा आशिया खंडातील इतर देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. आपले शेतकरी उत्कृष्ट तंत्रज्ञानही वापरत नाहीत किंवा पाण्याचा अतिशय काटेकोरपणे, दक्षतेने उपयोग करून घेत नाहीत. पाणी हे शेतीसाठीचे सर्वात महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे अर्धवट राहिलेल्या सिंचन योजना तातडीने पूर्ण करणे क्रमप्राप्त आहे. या योजनांमधील कालव्यांचे जाळे शेतकऱ्यांपर्यंत पुरेसे पाणी पोहोचेल, असे असावे. सिंचनाची सध्याची स्थिती अशी आहे की, कालव्याच्या केवळ सुरुवातीच्या काही भागातील शेतकरी अवैध पद्धतीने भरमसाट पाणी ओढून घेत आहेत. मात्र, दुसऱ्या टोकाचे शेतकरी पाण्याचा लाभ घेऊ शकत नाहीत. पाण्याच्या सुयोग्य वापराच्या दिशेने सुधारणा होणे आवश्यक आहे. राजकीय अपरिहार्यतेमुळे सरकार पाण्याची किंमत वसूल करू शकत नाही. पण शेतीतील कमी होत जाणारे उत्पन्न आणि कालव्यांची दिवसेंदिवस होणारी दुर्दशा हे वास्तव आहे. यासोबतच जमिनीखालील होणाऱ्या पाण्याच्या उपशावर कोणतेही नियंत्रण नाही. शेतकरी आपल्या बोअरवेलमधून हवे तेवढे पाणी पंपाने काढू शकतो. कारण वीज मोफत आहे. परिणामी पंजाबसह इतर राज्यांची भूजल पातळी लक्षणीय वेगाने घटत आहे. हवामान बदलामुळे ही परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता आहे.



बियाण्यांचा दर्जा हादेखील शेतीसाठी खूप महत्त्वाचा मुद्दा आहे. विविध राज्यांतील कृषी विद्यापीठांनी उच्च दर्जाचे बियाणे शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात फारसे योगदान दिलेले नाही. राज्य सरकारांकडून कृषी विद्यापीठांना आवश्यक निधीसह स्वायतत्ता दिली गेली पाहिजे. जेणेकरून संशोधन तसेच शिक्षणाच्या माध्यमातून शेतीची उत्पादकता वाढवली जाऊ शकेल. आनुवंशिकरीत्या संशोधित (जीएम) बियाण्यांबाबतचे धोरण स्पष्ट करणे आवश्यक आहे. काही व्यक्ती आणि संस्था जीएम बियाण्यांच्या विरोधात आहेत. पण या तंत्रज्ञानाचा लाभ न घेता आपण हवामान बदलाचा सामना करू शकतो का? नवे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी एक्सटेन्शन सिस्टिम हे मुख्य माध्यम आहे. पण दुर्दैवाने ही प्रणाली जवळपास सर्वच राज्यांमध्ये अपयशी ठरली आहे. ज्या ज्या ठिकाणी शेतीची पारंपरिक पद्धत बदलून नवी पीक पद्धती लागू करायची आहे, त्या त्या राज्यांमध्ये एक्सटेन्शन सेवा बळकट करावी लागेल. शेतकरी अनेकदा उत्पादनाला किमान हमी भाव (एमएसपी) कमी मिळतो, या मुद्द्यावरून संघर्ष करताना दिसतात. किमान हमी भाव योग्य मिळणे आवश्यकच आहे, पण या सर्व प्रक्रियेपासून राजकारणाला दूर ठेवावे लागेल. कृषी गुंतवणूक आणि मूल्य आयोगासारख्या तांत्रिक प्रणालीवर शेतमालाचा दर निश्चित करण्याची जबाबदारी सोपवली पाहिजे. आजच्या कायद्यानुसार, किमान हमी भाव (एमएसपी)ची तरतूद शेतकऱ्याने पिकवलेल्या मालाला ठराविकच किंमत मिळवून देण्याचा अधिकार देत नाही. केंद्र सरकारला सार्वजनिक वितरण प्रणालीसाठी धान्य खरेदी करावे लागत होते, त्या वेळी किमान हमी भाव या संकल्पनेची निर्मिती झाली. त्यासाठी भारतीय अन्न-धान्य महामंडळावर (एफसीआय) पंजाब व हरियाणात गहू-तांदूळाच्या किमतीत दळण-वळणाचा खर्च इत्यादी गृहीत धरून एमएसपीवर गहू-तांदूळ खरेदी करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. वास्तवात अन्नधान्य आयोगासाठीची खरेदी राज्य सरकारच्या एजन्सीज करत होत्या. वेळोवेळी अनेक पिकांसाठी एमएसपीची घोषणा झाली. पण या किमतीतच खरेदी करण्यासाठी कोणतीही प्रणाली उभी करण्यात आली नाही.

# इंधनाचा भडका



२०१४ मधल्या लोकसभेच्या निवडणुकांच्या प्रचारात भारतीय जनता पक्षाचे तेव्हाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार नरेंद्र मोदी, यांनी आपल्या पक्षाला केंद्राची सत्ता मिळाल्यास महागाईवर नियंत्रण आणून, सर्वसामान्य जनतेला 'अच्छे दिन' येतील, अशी ग्वाही दिली होती. केंद्रात तेव्हा सत्तेवर असलेल्या पुरोगामी लोकशाही आघाडीचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार लक्षावधी रुपयांचे घोटाळे आणि आकाशाला भिडलेल्या महागाईमुळे गाजत होते. महागाईने गांजलेल्या आणि भ्रष्टाचाराने वैतागलेल्या देशातल्या मतदारांत त्या सरकारच्या विरुद्ध खदखदत असलेल्या असंतोषाच्या ज्वालामुखीचा स्फोट त्या निवडणुकांच्या निकालात झाला. काँग्रेसचे पानिपत झाले आणि भाजपला लोकसभेत बहुमतासह सत्ता मिळाली. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले आणि जनतेला चांगले दिवस आणू, या आश्वासनाचाही त्यांना सोयीस्करपणे विसर पडला. त्यांनी दिलेली ग्वाही म्हणजे जनतेची शुद्ध फसवणूक करणारे, सवंग लोकप्रियते-साठी दिलेले आश्वासन होते. मोदी सरकारच्या गेल्या साडेतीन वर्षाच्या कारकिर्दीत महागाई तर कमी झाली नाहीच आणि गोरगरीब, शोषित, वंचित जनतेच्या समस्यांची सोडवणूकही झाली नाही. उलट महागाईच्या वणव्यात तेल ओतायचा उद्योग मात्र या सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती सातत्याने वाढवायच्या सत्राने सुरूच ठेवला आहे.

१ एप्रिलपासून सुरू झालेल्या नव्या आर्थिक वर्षाच्या प्रारंभीच केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पातल्या तरतुदीनुसार विविध करात वाढ झाल्याने काही वस्तू महाग झाल्याच, पण पेट्रोल आणि डिझेल इंधनाच्या किंमतीतही वाढ झाल्याने, महागाईचा वणवा अधिकच धडाडून पेटायची चिन्हे आहेत. १ एप्रिलपासून पेट्रोलियम कंपन्यांनी वाढवलेल्या दरामुळे आता पेट्रोलचा दर प्रति लिटर ८१.४८ पैसे आणि डिझेलचा दर प्रती लिटर ६७.६५ पैसे असा झाला आहे. गेल्या तीन वर्षातील इंधनाचे हे सर्वाधिक दर आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे, भारतातही पेट्रोल-डिझेलच्या किंमतीत वाढ होत असल्याचा केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान करीत असलेला दावा, खरा आणि वास्तव नाही. केंद्र सरकार पेट्रोल-डिझेलच्या किंमतीबाबत सातत्याने जनतेला अर्धसत्यच सांगते आहे. १ जुलै २०१७ पासून देशभरात समान करप्रणाली म्हणजेच वस्तू सेवा कराची अंमलबजावणी सुरू झाली. पण, या समान कर प्रणालीतून डिझेल, पेट्रोल मात्र सोयीस्करपणे वगळून केंद्र आणि राज्य सरकारांनी सर्वसामान्य जनतेवर कराची प्रचंड आकारणी करीत लुटीचे धोरण कायम ठेवले आहे. पेट्रोल आणि डिझेलवर जबर कर आकारणी करून प्रचंड महसुली उत्पन्न मिळवायच्या नादात जनतेला महागाईच्या वरवंट्याखाली भरडायचे हे धोरण काही बदलायला केंद्र आणि राज्य सरकारांची तयारी नसल्याने वाढत्या महागाईमुळे गरीब जनतेचे कंबरडे मोडले आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाच्या किंमती वाढत असल्यानेच पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत वाढ होत असल्याची सरकारची सबब पूर्णपणे दिशाभूल करणारी आणि जनतेला फसवणारी आहे. दोन वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलांच्या किंमती कमी होत्या. तेव्हाही केंद्राचा उत्पादन कर, अबकारी कर, राज्य सरकारांचा मूल्यवर्धित कर अशा विविध करांचा बोजा इंधनाच्या मूळ किंमतीच्या दुप्पटच होता. तेव्हा सरकारने ग्राहकांना खनिज तेलाची किंमत कमी झाल्याचा दिलासा देशातल्या ग्राहकांना दिला नाही. कराद्वारे जनतेची राजरोस लूट सुरूच ठेवली. गेल्या तीन वर्षात केंद्र आणि राज्य सरकारने पेट्रोलच्या किंमतीत तब्बल ९ रुपयांची आणि डिझेलच्या किंमतीत ७ रुपयांची उच्चांकी वाढ केलेली आहे. जबर करामुळेच ग्राहकांना पेट्रोल आणि डिझेल अधिक किंमतीने विकत घ्यावे लागत असल्याने उत्पादन शुल्क कमी करावे, अशी मागणी पेट्रोलियम मंत्रालयाने केंद्र सरकारकडे केलेली होती. पण, केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी या मागणीकडे साफ दुर्लक्ष करीत, आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पात या करात कपातीचे कोणतेही सूतोवाच केले नाही. परिणामी आशिया खंडात सर्वाधिक किंमतीला फक्त भारतातच डिझेल आणि पेट्रोलची विक्री होते. २७ रुपये ७४ पैसे अशी पेट्रोलची मूळ किंमत असताना त्यावर उत्पादन शुल्क २.५४ रुपये, मूल्यवर्धित कर ३०.४८ रुपये, अबकारी कर २१.४८ रुपये आणि विक्रेत्यांचे कमिशन, वाहतूक यासह १४.९९ पैसे कराची वसुली सक्तीने केली जाते. जी. एस. टी. मुळे राज्यांच्या महसुली करात घट होण्याची शक्यता असल्याने राज्य सरकारे पेट्रोल आणि डिझेलच्या विक्रीद्वारे मिळणारे हुकमी मूल्यवर्धित कराचे उत्पन्न सोडायला तयार नाहीत. राज्य सरकारांनी मूल्यवर्धित करात कपात करून डिझेल, पेट्रोच्या ग्राहकांना दिलासा द्यावा, या केंद्र सरकारच्या सूचनेला महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश आणि हिमाचल प्रदेश वगळता अन्य राज्य सरकारांनी हरताळ फासला. भाजपची सत्ता असलेल्या अन्य राज्यांच्या सरकारां-नीही हा कर कमी करायला साफ नकार दिल्याने इंधनाच्या किंमती सातत्याने वाढतच राहिल्या आहेत. एकट्या केंद्र सरकारला पेट्रोल, डिझेलच्या विक्रीतून कराद्वारे ३ लाख कोटी रुपयांचा वार्षिक महसूल मिळतो. राज्य सरकारांना मिळणारा महसूलही असाच प्रचंड आहे. मुक्त भांडवली अर्थव्यवस्थेच्या अंमलबजावणीनंतर गेल्या २६ वर्षात भारतात मोटारी, स्कूटर आणि मोटारसायकलींची संख्या कोट्यवधींनी वाढली. मोठ्या शहरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था चांगली असल्याने मजूर आणि मध्यम वर्गीयांनाही दुचाकी वापरण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. परिणामी पेट्रोलची किंमत कितीही वाढली, तरी ग्राहकांना सक्तीने ते विकत घ्यावेच लागते. सार्वजनिक आणि खाजगी प्रवासी वाहतुकीसाठी डिझेलचा वापर प्रचंड होतो. डिझेलची किंमत वाढल्यावर प्रवासी आणि वाहतुकीच्या भाड्यात तुलनेने सातत्याने वाढ होत राहाते आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीही वाढतात. महागाईवाढीच्या दुष्टचक्रात इंधन वाढीचे कारण सर्वाधिक महत्त्वाचे ठरते. कर आणि राज्य सरकारांच्या विविध उपकरणामुळेच देशभरात पेट्रोल-डिझेलच्या किंमतीचा भडका उडाला, तर महाराष्ट्रात प्रति लिटर ९ रुपयांच्या उपकराने या इंधनाला अक्षरश: आग लागली आहे. साताऱ्यात पेट्रोल ८२ रुपये प्रती लिटर आणि डिझेल ६८.२१ पैसे प्रति लिटर झाले, ते याच उपकरांच्या वाढीमुळे! केंद्र आणि राज्य सरकारांनी इंधनावरच्या करात-उपकरात कपात केली नाही तर यापुढेही महागाईचा वणवा असाच भडकत राहील आणि जनतेला मात्र वाईट दिवसांना सामोरे जावे लागेल.

## योजनांचा सुकाळ अंमलबजावणीचा दुष्काळ

**नवी मुंबई-** नवी मुंबई महापालिकेच्या समाज विकास विभागांच्या विविध कल्याणकारी योजना लाभार्थीपर्यंत पोहोचतच नसल्याचा आक्षेप स्थायी समितीच्या बैठकीत नगरसेवकांनी घेतला. या योजनांचा लाभ लवकरात लवकर लाभार्थींना मिळवून देण्यात यावा, अशी मागणी करत प्रशासनाच्या उदासीन कारभारावर टीका करण्यात आली.




विविध कल्याणकारी योजनांत वस्तू खरेदी करून त्याचे देयक पालिकेला सादर केल्यानंतरच अनुदान खात्यावर जमा होते. त्याला नगरसेवकांनी विरोध केला. ज्या व्यक्तीची आर्थिक स्थिती दुर्बळ आहे, ती व्यक्ती वस्तू खरेदीसाठी खर्च कशी करू शकेल, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. नियम अटी शिथिल करूनच हा निर्णय लागू करण्याचा प्रस्ताव सभागृहात मंजूर करण्यात आला. विद्यार्थी आणि महिलांसाठीच्या विविध योजना २०१३पासून पूर्णत: बंद असल्याने नगरसेवकांनी नाराजी दर्शवली. अतिरिक आयुक्त अंकुश चव्हाण यांनी सर्व योजना सुरू असल्याचे सांगितले.

स्थायी समिती सभापती शुभांगी पाटील यांनी पाच वर्षांत महिला बचतगटांचे अनुदान, विधवा महिला अनुदान महिलांपर्यंत पोहचले नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. प्रशासनाने लाभार्थीची यादी जाहीर, करावी अशी मागणी करण्यात आली. प्रशासनाने विरंगुळा केंद्रात आद्याप अत्याधुनिक सेवा उपलब्ध करून दिल्या नसल्याबद्दल खंत व्यक्त करण्यात आली. तसेच प्रशासकीय अधिकारी या योजना नागरिकांपर्यंत पोहचल्यात की नाहीत याची शहानिशा करत नसल्याची टीका करण्यात आली.

## शहरांच्या वेशीवर कचऱ्याचे साम्राज्य

**ठाणे- ठाणे जिल्हयातील कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर या शहरांमध्ये सध्या सर्वत्र स्वच्छता सर्वेक्षणाचे वारे वाहात आहेत. या शहरांतील स्वच्छतेसाठी महापालिका प्रशासन विशेष मोहिमा राबवत असताना शहरांच्या वेशीवर मात्र कचऱ्याचे साम्राज्य दिसून येत आहे. शहरांच्या हद्दीला लागून असलेल्या ग्रामपंचायतींमधून जाणाऱ्या महामार्गाशेजारी कचऱ्याचे ढीग पाहायला मिळत आहेत. काटई नाका ते बदलापूर या महामार्गावर ठिकठिकाणी साठलेल्या कचऱ्यामुळे स्वच्छ भारत अभियानाला हरताळ फासला जात आहे.**



देशात आणि राज्यात स्वच्छ सर्वेक्षणाच्या माध्यमातून मोठ्या महापालिका, नगरपालिकांच्या स्वच्छतेची तपासणी सुरू आहे. यात सर्वच महापालिका आणि नगरपालिकांतील विविध प्रभागात कचरा वर्गीकरण, प्रक्रिया असे अनेक प्रयोगही राबवले आहेत. मात्र ही स्वच्छता फक्त त्या महानगरांपुरतीच मर्यादित राहिल्याचे चित्र समोर आले आहे. कल्याण-डोंबिवली महापालिका, उल्हासनगर महापालिका आणि अंबरनाथ नगरपालिकेच्या वेशीवर असलेल्या गावांमध्ये मात्र सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य पाहायला मिळते आहे. डोंबिवलीच्या वेशीवर असलेल्या काटई फाट्यापासून महामार्गाने बदलापूरच्या दिशेने निघाल्यास ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर फेकलेला कचरा पाहायला मिळतो. काटई फाट्याच्या पुढे कोळेगाव ते हेदुटणे ते खोणी फाटा या भागांत रस्त्याच्या दुतर्फा हा फेकलेला कचरा दिसून येतो. तसेच पुढे धामटण, नेवाळी फाटा, डावळपाडा या गावातून जाणाऱ्या महामार्गाच्या कडेला काहीशे फुटांपर्यंत कचरा पसरलेला दिसतो. त्यात प्लास्टिकच्या कचऱ्याचा मोठा भाग दिसतो.

अनेकदा गावकरी येथील कचरा जाळून नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. मात्र त्यामुळे महामार्गावरील वाहनचालकांना धुराचा त्रास सहन करावा लागतो. सर्व कचरा एकत्रितपणे फेकला जात असल्याने अनेकदा येथे दुर्गंधीही सुटते. मात्र हा कचरा फक्त गावकऱ्यांचा नसून आसपासच्या शहरातील काही छोटी कचऱ्याची वाहनेही इथे छुप्या पद्धतीने खाली केली जातात, असा आरोप ग्रामस्थ करतात. तसेच महामार्गाला लागून असलेल्या अनेक हॉटेल आणि धाब्यांमध्ये उरलेले शिळे अन्न आणि कचराही येथे टाकला जात असल्याचे ग्रामस्थ सांगतात. त्यामुळे परगावाहून येणाऱ्या प्रवाशांसमोर अस्वच्छतेचे चित्र उभे राहते. यामुळे या भागाची बदनामीही होत असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

## उल्हासनगर पोटनिवडणुकीत भाजपचा पराभव

**उल्हासनगर-** राज्यमंत्री रवींद्र चव्हाण आणि पप्पू कलानी पुत्र ओमी यांनी प्रतिष्ठेच्या केलेल्या उल्हासनगर महापालिकेच्या पोटनिवडणुकीत भाजपला पराभवाचा धक्का बसला असून प्रभाग क्रमांक १७ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने निसटता विजय मिळवला आहे. या पराभवामुळे उल्हासनगरात कलानी-चव्हाण युतीला हादरा आहे. उल्हासनगर महापालिकेवर सत्ता स्थापन करण्यासाठी दीड वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत भाजपने ओमी कलानी यांची साथ धरली. उल्हासनगर महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १७ ब मधील नगरसेविका पूजा कौर लबाना यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने या ठिकाणी ६ एप्रिल रोजी पोटनिडणूक घेण्यात आली होती. हा प्रभाग राष्ट्रवादी काँग्रेसचा एके काळचा बालेकिल्ला मानला जातो. या ठिकाणी भाजपच्या तिकिटावर ओमी कलानी गटाच्या साक्षी पमनानी यांनी अर्ज दाखल केला होता. शिवसेना आणि रिपाइंने या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसला जाहीर पाठिंबा दिला होता. राष्ट्रवादीने आपला गड राखण्यात यश मिळवले असून भाजपला धक्का बसला आहे. अवघ्या २०३ मतांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुमन सचदेव यांचा विजय झाला. या विजयामुळे महापालिकेतील सत्तासमीकरणांवर काहीच परिणाम होणार नाही.



## वसई–विरारमध्ये प्लास्टिकबंदीचा बोऱ्या



- कचराकुंडीत प्लास्टिकच्या पिशव्यांचा खच,
- वसई-विरार महापालिकेची कारवाई थंडावली;
- विक्रेत्यांकडून सर्रास वापर

**वसई-** पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या आणि वस्तूंवर राज्य सरकारने बंदी घातली असतानाही वसई-विरारमध्ये शासनाच्या अध्यादेशाचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे. हॉटेल व्यावसायिक, फेरीवाले, किरकोळ विक्रेते यांच्याकडून सर्रास प्लास्टिकचा वापर केला जात असल्याचे चित्र आहे. महापालिकेनेही प्लास्टिकचा वापर करणाऱ्यांविरोधातील कारवाई थांबवली असल्याने विक्रेते आणि खरेदी करणाऱ्यांचे फावले असून शहरात प्लास्टिकबंदीचा बोऱ्या उडाला आहे. राज्य सरकारने प्लास्टिकबंदीचा निर्णय घेतल्यानंतर वसई-विरारच्या हॉटेल, फेरीवाले, किराणा माल दुकानदार यांच्याकडून सुरुवातीला त्याचे पालन करण्यात आले. महापालिकेनेही दंडात्मक कारवाई ठिकठिकाणी सुरू केली होती. मात्र पालिकेची कारवाई थंडावली आहे. शासनाकडून एक महिना सवलत असल्याने कारवाई थांबल्याचे महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले. मात्र जनजागृती सुरू असल्याचे पालिका आयुक्त सतीश लोखंडे यांनी सांगितले.

कारवाई होत नसल्याने वसई-विरारमध्ये प्लास्टिकबंदी कागदावरच राहिली आहे. अनेक दुकानदार, किरकोळ विक्रेते, फेरीवाले प्लास्टिक पिशव्यांचा सर्रास वापर करत आहेत. दुकान, हॉटेल, बीअर शॉप, मटण, चिकन दुकाने, मासळी बाजार आदी ठिकाणी प्लास्टिक पिशव्या वापरू नका याबाबत महापालिकेतर्फे माहिती देण्यात आली होती, माहितीपत्रक वाटण्यात आले होते. अनेक दुकानांत प्लास्टिक पिशवी मागू नये, असे फलकही लावण्यात आले. परंतु आता कारवाईच थंडावली असल्याने प्लास्टिकचा वापर सुरू झाला आहे. काही दिवसांपूर्वी कचराकुंडीत प्लास्टिक दिसत नव्हते, मात्र आता पुन्हा प्लास्टिकच्या पिशव्याचा खच दिसू लागला आहे.

शासनाकडून प्लास्टिक वापरासाठी एक महिना सवलत मिळाल्याने कारवाई होणार नाही. त्यानंतर जो निर्णय येईल, त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. आता तरी महापालिकेच्या हद्दीतील कारवाई थांबली आहे. परंतु पालिकेतर्फे प्लास्टिकचा वापर टाळण्याविषयी जनजागृती चालू आहे.

## नवी मुंबईत फेरीवाल्यांचा सुळसुळाट

***नवी मुंबई-* शहरातील फेरीवाला सर्वेक्षण पूर्ण झाले असून दोन्ही फेऱ्यांत मिळून एकूण सात हजार ३२६ फेरीवाल्यांची नोंद करण्यात आली आहे. पालिकेच्या स्थापनेनंतर आजवर केवळ दोन हजार १३८ फेरीवाल्यांनाच परवाने देण्यात आले होते. उर्वरित सर्व फेरीवाले विनापरवाना व्यवसाय करत होते. आता परवान्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच फेरीवाल्यांना परवाना देण्यात येणार असल्याची माहिती पालिकेच्या परवाना विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.***



फेरीवाला सर्वेक्षणाला बेलापूर विभागापासून सुरुवात करण्यात आली होती. पहिली फेरी नोव्हेंबरमध्ये तर दुसरी फेरी फेब्रुवारीत सुरू करण्यात आली. पहिल्या फेरीत तीन हजार ७२१ तर दुसऱ्या फेरीत तीन हजार ६०५ अशा एकूण सात हजार ३२६ फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले.

उच्च न्यायालयाने रेल्वे स्थानकापासून १५० मीटपर्यंत फेरीवाल्यांना मनाई केली असूनही नवी मुंबईतील अनेक रेल्वेस्थानकांबाहेर तर कही ठिकाणी स्थानकातच फेरीवाले आहेत. फेरीवाले जिथे व्यवसाय करतात, तिथे जाऊन ठिकाण, आधार क्रमांक ॲपमध्ये नोंदवण्यात आले. ओटीपी क्रमांक फेरीवाल्यांच्या मोबाइल फोनवर आल्यानंतर आणि फेरीवाल्याने तो सर्वेक्षकास सांगितल्यानंतर त्याचे आधारकार्ड छायाचित्रासह ॲपमध्ये समाविष्ट केले जात होते. त्यानंतर फेरीवाल्यांचे दोन कोनांतून व्यवसायासह फोटो काढले जात. जागेचा अक्षांश रेखांश ॲपमध्ये समाविष्ट झाल्यानंतरच फेरीवाल्याचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात येत होते.

आता सर्वेक्षण पूर्ण झाल्याने विभाग अधिकाऱ्यांमार्फत कागदपत्रांच्या छाननीचे काम करण्यात येत आहे. नियमावलीत बसणाऱ्यांना आणि आवश्यक कागदपत्र असलेल्यांनाच पात्र ठरवले जाणार आहे. शहराच्या लोकसंख्येच्या आधारे न्यायालयाच्या निर्देशानुसार फेरीवाल्यांबाबत योग्य निर्णय घेतला जाणार आहे.

# पराभवाच्या भीतीमुळेच भाजपला युतीची आठवण

**बेलापूर- आगामी काळातील निवडणुका स्वतंत्रपणे लढण्याची भाषा करणाऱ्या भाजपचा आत्मविश्वास डगमगला आहे. अपयशाची भीती वाटल्याने भाजप मेळाव्यात एनडीए एकत्रित निवडणुका लढणार असल्याचे वक्तव्य भाजपचे अध्यक्ष अमित शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ही टीका शिवसेना नेते व राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी नेरूळ आगरी कोळी भवन येथे झालेल्या पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात केली आहे. आगामी काळातील निवडणुका शिवसेना पक्ष स्वतंत्ररीत्या लढणार असल्याचे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी याआधीच स्पष्ट केले आहे. याबाबत ठरावही झाला असल्याचे त्यांनी सांगितले.**

शिवसेनेच्या वतीने सिंधुदुर्गपासून पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मेळावे घेण्यात येत आहेत. नवी मुंबईतील नेरूळ येथील मेळावा त्याचाच एक भाग होता. या वेळी देसाई यांनी भाजपसह इतर पक्षांच्या नेत्यांचा समाचार घेतला. शिवसेना डोळ्यांसमोर निवडणुका ठेवून कधीच काम करीत नाही. नवी मुंबई शहरात शिवसेना वाढविण्याचा सल्ला या वेळी देसाई यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिला. पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभा, विधानसभा यासह पालिकेच्या एकत्रित निवडणुकांनाही शिवसेना तयार असल्याचे सांगितले.



शिवसैनिक जिवंत असेपर्यंत ठाण्यामध्ये कोणालाही सत्ता मिळणार नसल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीत ५० हजार मतांचे मताधिक्य नवी मुंबईतून मिळाले. बेघर होण्याची वेळ आलेल्या दिघ्यातील नागरिकांच्या मदतीला सर्वांत आधी शिवसेनाच मदतीला धावली. नवी मुंबईत शिवसेना कार्यकर्त्यांचा आलेख वाढत आहे.

# हॉर्नचे प्रदूषण रोखण्यासाठी 'नो हॉर्न प्लीज'चा उपक्रम

**कल्याण- कल्याण आरटीओ आणि कल्याणमधील विविध रिक्षा संघटना, तसेच मुंबई रिक्षामेन्स युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने 'नो हॉर्न प्लीज'चा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. वाहनांच्या हॉर्नमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी हा उपक्रम आहे. राज्याचे विधी व न्याय विभाग सचिव राजेंद्र भागवत यांच्या हस्ते आज (ता. ७) कल्याण आरटीओ कार्यालय परिसरात त्याचे उद्घाटन करण्यात आले.**

या वेळी 'नो हॉर्न प्लीज' उपक्रमाची माहिती आरटीओ अधिकारी संजय ससाणे यांनी दिली. भागवत यांनी कल्याण आरटीओ कार्यालयामार्फत वाहनचालक व नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधांची पाहणी करताना माहिती घेतली. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करीत हॉर्नचे प्रदूषण रोखण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. या वेळी कल्याण आरटीओ उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संजय ससाणे, आय. एच. मासुमदार, मुंबई रिक्षामेन्स युनियन पदाधिकारी तंबी कुरियन, शिरीष नाईक, विविध रिक्षा संघटना पदाधिकारी, आरटीओ अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे जनजागृती करण्यासाठी विशेष क्लृप्त्यांचाही वापर केलेला दिसून आला. या वेळी अनेक रिक्षांच्या पाठीमागे 'नो हॉर्न प्लीज'चे स्टिकर लावण्यात आले होते.



हॉर्नच्या अतिरिक्त आवाजाबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी एका रिक्षाला १५० हून अधिक हॉर्नने सजवण्यात आले होते.

# वेश्याव्यवसायप्रकरणी इंदापुरातील राष्ट्रवादीच्या नगरसेवकाविरुद्ध गुन्हा

**रायगड-** इंदापूरमधील एका लॉजवर ग्रामीण पोलिसांनी छापा टाकून वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांची सुटका केली. वेश्याव्यवसायात प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचा नगरसेवक सामील असल्याचे निष्पन्न



झाले असून वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी नगरसेवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी इंदापूर नगरपालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेसचा नगरसेवक अनिकेत अरविंद वाघ आणि लॉजचालक अजय बाळसाहेब शिंदे (दोघे रा. इंदापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सजन हंकारे यांनी या संदर्भात इंदापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंदापुरातील खडकपुरा भागात असलेल्या रूपाली लॉजवर वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक हंकारे यांना मिळाली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचा नगरसेवक-लॉजमालक वाघ आणि लॉजचालक शिंदे हे युवतींना पैशांचे आमिष दाखवून त्यांना वेश्याव्यवसायास प्रवृत्त करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी शहानिशा केली. बनावट ग्राहकाच्या माध्यमातून खातरजमा करण्यात आल्यानंतर शुक्रवारी (६ एप्रिल) पोलिसांनी तेथे छापा टाकला. पोलीस निरीक्षक हंकारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ननावरे, खंडागळे, पोमणे, यांनी ही कारवाई केली.

# 'साक्ष बदलण्यासाठी सलमानकडून पैशांचे आमिष', भाजप नेत्याचा गंभीर आरोप

**इंदूर-** काळवीट शिकारप्रकरणी अटक करण्यात आलेला सलमान खानला २ दिवसात जामीन मंजूर झाला आणि सोशल मीडियावर विविध चर्चांना उधाण आले. आता भाजपचे नेते कैलाश विजयवर्गीय यांनी सलमान खानवर गंभीर आरोप केला आहे. सलमान खान पैशांच्या बळावर साक्षीदार खरेदी करण्याचा प्रयत्न करत होता, असा आरोप त्यांनी केला आहे. इंदूरमधील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे. यावेळी बोलताना विजयवर्गीय म्हणाले की, 'सलमान



खानला अटक केल्यापासून टीव्हीवर सगळीकडे त्याच्याच बातम्या दाखवल्या जात आहे. सलमानने कोणते पुण्याचे काम केलेले नाही, कोणते चांगले काम केलेले नाही. त्याने काळवीटाची शिकार केली आहे आणि याबद्दल त्याला शिक्षाही सुनावण्यात आली आहे. बिश्नोई समाजाचे कौतुक करताना ते म्हणाले की, ज्या शेतकऱ्यांकडे २ एकर, ५ एकर शेती आहे त्यांनी सलमानविरोधात साक्ष दिली.

# दलित युवकांनीच रामदास आठवलेंवर फेकले काळे कपडे



**सूरत-** दलित बांधवांवर होणाऱ्या अन्यायाच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. याविरोधात केंद्रीय मंत्री रामदास आठवले हे काहीच करत नाही, असं म्हणत काही दलित तरुणांनी रामदास आठवले मुर्दाबाद अशा घोषणा दिल्या. त्यांच्यावर काळे कपडे फेकले. दरम्यान या तरुणांना ताब्यात घेण्यात आलं आहे.

देशात दलितांविरोधात अन्याय सुरू आहे. मात्र असे असले तरी आमचे नेते म्हणवणारे नेते मंत्री होऊन गप्प बसले आहेत. त्यांचा धिक्कार करत या दलित तरुणांनी पत्रकार परिषदेदरम्यान आक्रमक होत रामदास आठवले यांना काळे झेंडे दाखवले आणि काळे कपडे रामदार आठवले यांच्यावर फेकले.

# लैंगिक अत्याचाराबद्दल चौघांना जन्मठेप

**राधानगरी-** तालुक्यातील कासारपुतळे गावातील अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याबद्दल



दोषी ठरलेल्या चौघांना जन्मठेपेची शिक्षा झाली. पुणे जिल्ह्यातील मुलगा, त्याचे आई-वडील व एका महिलेचा समावेश आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. यू. कदम यांनी ही शिक्षा सुनावली. सिंधू जालिंदर गायकवाड (वय ६२, रा. आंबळे, ता. पुरंदर), संतोष जालिंदर गायकवाड (वय ४०), जालिंदर बाळू गायकवाड (वय ६८), इंदुबाई भिकाजी भोसले (वय ६५, रा. मांडर, ता. पुरंदर) अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत.

पीडित मुलीच्या वडिलांनी पोलिसात तक्रार दिली होती. पीडित मुलगी अल्पवयीन असून ती पालकांसोबत कासारपुतळे गावात राहात होती. आई रागावल्यामुळे १० नोव्हेंबर २०१४ रोजी मुलगी घरातून निघून गेली. १२ नोव्हेंबर रोजी ती आदमापूर (ता. भुदरगड) येथे संत बाळू मामा मंदिराच्या बाहेर बसली होती. त्या वेळी दर्शनासाठी आलेल्या जालिंदर गायकवाड व सिंधू गायकवाड यांनी तिला सांभाळतो असे सांगून आपल्या गावी आंबळे येथे नेले. संतोष गायकवाड याच्याबरोबर अल्पवयीन मुलीचे लग्न करून देण्याचा त्यांचा विचार होता.

# आईनेच चिमुकला रडत असल्याने घट्ट आवळले, त्यातच गेला त्याचा जीव

**घाटनांद्रा-** पतीसोबत झालेल्या कौटुंबिक वादाचा राग मनात धरून जन्मदात्या आईनेच दहा वर्षाच्या चिमुकल्याला कडेवर घेऊन शेतात गेली तेव्हा चिमुकला रडू लागताच तिने त्याना अंगाशी घट्ट धरले यात गुदमरून चिमुकल्याचा जीव गेला. त्याची हालचाल होत नसल्याचे पाहून तिने त्याना चिमटा घेऊन पाहिला परंतू तो मृत झाल्याचे लक्षात आले. भितीपोटी पती व दिरावर आळ घेतल्याने दोन दिवसांपुर्वी दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तपासाअंती आईनेच चिमुकल्याची हत्या केल्याचे समोर आल्याने घाटनांद्रा (ता. सिल्लोड) येथील खुनाच्या या प्रकरणाला शुक्रवारी वेगळीच कलाटणी मिळाली आहे. कविता संदीप मोरे असे आरोपी महिलेचे नाव आहे. तिला न्यायालयात हजर केले असता १५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली असून तिची हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.



३१ मार्च रोजी कविता व तिचा पती संदीप मोरे यांच्यात कौटुंबिक वाद झाला होता. याचा राग मनात धरून तिने एक एप्रिल रोजी पहाटे चार वाजेच्या सुमारास कुणाला काही न सांगता तिचा मुलगा सागर ऊर्फ रुद्र (१०) याला घेऊन घराबाहेर पडली. दरम्यान, झोपेतून जागे झालेल्या मोरे कुटुंबीयांना बाळासह कविता घरात दिसली नसल्याने नातेवाइकांनी तिचा शोध घेतला. परंतु, न सापडल्याने बाबूराव मोरे यांनी सिल्लोड ग्रामीण पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार दिली होती. तक्रारीनंतर पोलिसांसह ग्रामस्थांनी पूर्ण दिवस तिला शोधण्याचा प्रयत्न केला.

# योगी आदित्यनाथांचे मंत्री म्हणतात - सर्व ३२५ आमदार नालायक

**लखनऊ-** उत्तर प्रदेश सरकारमधील कॅबिनेट मंत्री ओमप्रकाश राजभर यांनी पुन्हा



एक वादग्रस्त वक्तव्य केले आहे. थेट मुख्यमंत्री योगी आदित्यनाथांवर शरसंधान करताना त्यांनी राज्यातील सर्व ३२५ आमदार नालायक असल्याचेही म्हटले आहे. ओमप्रकाश राजभर सुहेलदेव हे भारतीय समाज पार्टी (एसबीएसपी) या पक्षाचे प्रमुख असून या पक्षाची भारतीय जनता पक्षाशी युती आहे.

'जनतेने निवडलेले ३२५ आमदार नालायक सिद्ध झाले म्हणूनच त्यांच्यापैकी कोणाला मुख्यमंत्री करण्यात आले नाही. जे आमदार निवडून आले आमदार त्यांच्यापैकीच एक व्हायला पाहिजे,' असे ते म्हणाले. उत्तर प्रदेशातील बलिया जिल्ह्यातील बेटी बचाओ बेटी पढ़ाओ कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपशी युतीबाबत छेडले असता ते म्हणाले, की तिचे भवितव्य अमित शाह यांच्याशी होणाऱ्या भेटीनंतरच ठरेल. मंगळवार, १० एप्रिल रोजी ही भेट होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# मुंबई फास्ट न्यूज चॅनेलच्या द्वितीय वर्धापन संपन्न

**(पान १ वरुन)** निवडून येऊन आज महापौर या पदावर विराजमान झालेल्या सौ. मिनाक्षी शिंदे , मिरा भाईंदर शहरातील होणाऱ्या भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करणारे जिद्दी मराठा प्रतिष्ठान चे श्री. प्रदिप जंगम ,मैदान उपलब्ध नसतानाही मातीतला कुस्ती पेहलवान म्हणून प्रसिध्दी मिळवलेला श्री. रुपचंद माने , रस्त्यावर भिख मागणाऱ्या मुलांना व अनाथ मुलांना एकत्र करुन त्यांचे शिक्षण पूर्ण करण्याचा, त्यांना शिस्त शिकवण्याचा व व्यसनापासून दूर करण्यासाठी रस्त्यावर शाळा घेणारी श्रीमती यास्मीन हुसेन पत्रकार म्हणून २४ तास कार्यरत असलेले व दंगल असो किंवा कोणताही प्रसंग असो, उत्कृष्ट कामगिरी सर्वांना घेऊन समाजत कार्य करणाऱ्या माजी महापोर सौ गीता जैन याना ही पुरस्कार देण्यात आला. कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाऊन आपले पत्रकारीताचे कार्य चोख बजावणाऱ्या एबीपी माझा चॅनेलचे श्री. प्रभाकर कूडाळकर , शिवसेनेतून अनेक कार्यक्रमाचे आयोजन करुन जनसामान्यात आपला ठसा उमटवणारे लोकांना नेहमी सहकार्य करणारे नागोबा फाऊडेशनचे संस्थापक, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख श्री. शंकर अंकूश विरकर त्याचप्रमाणे मिरा भाईदर अग्नीशामक दल ,अत्यंत गंभीर व तणावग्रस्त परिस्थितीत जिवाची बाजी लावणाऱ्या जीगरबाज जवानांना ही गौरव पुरस्कार देण्यात आला. सतत चौदा वर्षे जनसेवा आरोग्य शिबीराच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीर, जेष्ठ नागरिकांसाठी ठिकठिकाणी विरंगूळा केंद्र उभारणे असे अनेक कार्यक्षेत्रात कोणतीही



सरकारी मदत न मिळता सतत १४ वर्षे सेवाभावी ट्रस्ट चालवणारे आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक चे संस्थापक श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांना उज्वल निकम यांनी गौरव पूरस्कार देऊन सन्मान केला. या कार्यक्रमात मिरा भाईंदर जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे अध्यक्ष श्री. दिलीप पवार व त्यांचे पदाधिकारी यांचा ही सत्कार मानचिन्ह देऊन करण्यात आला. यामध्ये मिरा भाईंदर चे सर्व पत्रकार , मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष श्री गोवर्धन देशमुख , सचिव श्री. कृष्णा हरिबा जाधव , सल्लागार ॲड श्री. प्रमोद सामंत आदी मान्यवर उपस्थित होते.




आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)